दैनिक हेराल्ड
गोवा
मंगळवार, १ एप्रिल २०२५


## निवडक

### हरमल मिरची संघटनेची बैठक खेळीमेळीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३१ :** येथील हरमल मिरचीला जीआय मानांकन प्राप्त झाल्यानंतर या भागातील शेतकऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली. सदरची बैठक जीआय विभागाचे नोडल अधिकारी दीपक परब यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पंचायत सभागृहात पार पडली. यावेळी अध्यक्ष लवू ठाकूर,सचिव दत्ताराम पार्सेकर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीस तालुक्यातील २०० शेतकरी सभासद उपस्थित होते.
संस्थेचे सचिव दत्ताराम पार्सेकर यांनी मागील कार्यकाळाचा जमाखर्च सादर केला व त्यावर अनेक साधक बाधक चर्चा करण्यात आली.
विद्यमान कार्यकारिणीची मुदत संपली असल्याने नवीन सदस्यांची निवड करण्यात आली आहे. पुढील आठवड्यात पदाधिकारी निवडण्यात येईल, असे पार्सेकर यानी सांगितले. यावेळी समितीचे सदस्य आत्माराम नाईक यांचे देहावसान झाल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या समितीची रीतसर नोंदणी झाली असून नवीन सभासदाची नावे सरकारदरबारी नोंद करण्यासाठी पाठवावी अशी सूचना सभासद भिकाजी नाईक व सदानंद नाईक यांनी केली. जमाखर्च अहवालास बाळा नाईक व रंगनाथ मेथर यांनी अनुमोदन दिले.यावेळी सचिव दत्ताराम पार्सेकर यांनी बँक पासबुक,ऑडिट प्रत व पावती पुस्तके सादर केली.
दरम्यान, मिरची समितीला, सरकारकडून किती अनुदान मिळाले आहे, असा प्रश्न केला असता नोडल अधिकारी परब यांनी सरकारकडून अद्याप काहीच मिळाले नसल्याचे स्पष्ट केले. यंदाच्या वर्षी मिरची पीक वाढीसाठी सरकारने साह्यभूत उपाययोजना व आर्थिक सहाय्य देण्यासाठी पावले उचलावीत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.
या भागातील शेतकरी मिरची उत्पादन वाढीसाठी वावरत आहेत. मात्र सरकारकडून आवश्यक पाठबळ मिळत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी बोलून दाखवली. आगामी वर्षासाठी भिकाजी सहदेव नाईक, सदानंद नाईक, सकोजी नाईक, भगवान नाईक, सुशांत नाईक, अलका नाईक, बाळा नाईक, विद्याधर ठाकूर, शेखर ठाकूर यांची सदस्यपदी निवड करण्यात आली. या सदस्यातून पदाधिकारी निवडण्यात येईल. नोडल अधिकारी दीपक परब यांचे मार्गदर्शन व पंचायत समितीने सभागृह विनामूल्य दिल्याबद्दल खास आभार मानण्यात आले. दत्ताराम पार्सेकर यांनी आभार मानले.

---

### हरमल येथे उद्यापासून कौशल्य व्यवस्थापन विषयक कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३१ :** येथील श्री सिद्धेश्वर संस्था व गोवा सरकारची ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या विद्यमाने बुधवार दि. २ व गुरुवार दि. ३ रोजी सकाळी १० वाजल्यापासून स्वयंरोजगार कौशल्य आधारित व्यवसाय व्यवस्था कार्यशाळा सार्वजनिक गणेशोत्सव सभागृहात आयोजित केल्याची माहिती संस्थेच्या सचिव श्वेता भास्कर नाईक रामजी यांनी कळविले आहे. या कार्यशाळेत राज्यातील व गोवा सरकारच्या आरडीए विभागातील निष्णात व तज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन मिळेल. या कार्यशाळेत भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी संपर्क साधावा किंवा थेट सभागृहात उपस्थित राहावे असे आवाहन श्री सिद्धेश्वर संस्थेतर्फे केले आहे.

---

### आगोंद, खोतिगाव व खोला पंचायत क्षेत्रात ३ रोजी खंडीत वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३१ :** गुरुवार दि. ३ रोजी, आगोंद, खोतिगाव व खोला पंचायत क्षेत्रात खंडीत वीजपुरवठा करण्यात येईल, असे काणकोण वीज कार्यालयातर्फे कळविण्यात आले आहे. आगोंद व खोला पंचायत परिसरातील ११केव्ही आगोंद फीडरवर गुरुवार दि. ३ रोजी, सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत वीज वाहिन्यांची दुरुस्ती तसेच वीज वाहिन्यांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यासाठी व पावसाळा पुर्व कामांकरिता वीजपुरवठा खंडित केला जाईल. यामध्ये संपूर्ण आगोंद पंचायत व देवाबाग, आडपे, या भागाचा तसेच खोला पंचायत क्षेत्राचा समावेश आहे.तसेच याच दिवशी दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत खोतीगाव पंचायत क्षेत्रातील ११ केव्ही फीडरवर वीजपुरवठा खंडित करण्यात येईल. यामध्ये संपूर्ण खोतीगाव क्षेत्राचा समावेश रहाणार आहे. असे काणकोण वीज अभियंत्याने कळविले आहे.

---

### कुमयामळ साळ येथे ३ रोजी 'परब्रह्म आले भेटी'

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ३१ :** कुमयामळ – साळ येथे गुरुवार दि. ३ रोजी श्री राष्ट्रोळी रंगमंचकावर श्री राष्ट्रोळी सेल्फ हेल्प ग्रुप महिला मंडळ – कुमयामळ निर्मित सुभाष आसोलकर लिखित मधू सूर्या राऊत दिग्दर्शित दोन अंकी संत कालीन संगीत नाटक 'परब्रह्म आले भेटी' सादर केले जाईल.
या नाट्यप्रयोगाचे संगीत दिग्दर्शक व ऑर्गन साथ मधू सूर्या राऊत, तबला – सुविशांत बोर्डेकर, सहाय्यक दिग्दर्शक – भिकाजी पडवळ, नलिनी परब, पार्श्वसंगित – नीलेश नाईक, ध्वनि संकलन – सुभाष शिरोडकर (बांदा), रंगभूषा – जितेंद्र परब, वेशभूषा, प्रकाश योजना, नेपथ्य – गुरुप्रसाद रंगमंच कासारपाल यांची आहे.
या नाट्यप्रयोगात प्राची च्यारी, नमिता पिरणकर, दिक्षिता नाईक, नेहा पिरणकर, पूजा पिरणकर, सुचिता नाईक, पुनम नाईक, गौरीता गवस, निधी व्हेगस, स्वाती गवस, श्रीशा नाईक, दिव्या पिरणकर, दिव्या नाईक, राशी पिरणकर, सानिका नाईक, वेदिका नाईक, श्रद्धा पिरणकर, रेश्मा पिरणकर, सानिका नाईक, आर्वी पिरणकर, प्राजक्ता आरोंदेकर, आर्या नाईक, रोशनी पिरणकर, रेषा पिरणकर, सुहाना पिरणकर आदी महिला कलाकार भूमिका साकारणार आहे. तसेच कुमयामळा ग्रामस्थ सदर नाट्यप्रयोगाचे व्यवस्थापक आहेत.

---

### हरमल येथील काशिकल्याणी देवस्थानचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३१ :** बामणभाटी येथील श्री कुलदेव काशिकल्याणी ब्राह्मण देवस्थानचा ९वा वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात व विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.
यादिनी सकाळी शुद्धीकरण, धार्मिक विधी, होम, देवाचा नारळ बदलला, त्यानंतर श्री सत्यनारायण महापूजा, महानैवेद्य व संध्याकाळच्या सत्रात संध्या नाचू कीर्तनी राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प सुहासबुवा वझे यांची शिष्य सना साटेलकर (हरमल) हिचे कीर्तन झाले, त्यांना सुजय तीळवे (हार्मोनियम) व अंकुश नाईक (तबला) यांनी साथसंगत केली.यंदाच्या वर्षी भाविकांनी उत्स्फूर्तरित्या सहभाग घेतला. देवस्थानच्या उत्सवात भावीकांनी सढळहस्ते मदत केल्याबद्दल देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश नाईक रामजी व पदाधिकाऱ्यांनी जाहीर आभार मानले.

---

### मांद्रे स्वरगंधातर्फे ७ पासून उन्हाळी कला शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३१ :** दांडोसवाडा मांद्रे येथील स्वरगंधा प्राथमिक विद्यालय,आयोजित उन्हाळी कला शिबिर सोमवार दि. ७ ते शनिवार दि. १२ दरम्यान सकाळी ८ ते १०.३० या वेळेत आयोजन केले असल्याचे सांगण्यात आले आहे.
या शिबिरात मांद्रे गावातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयांमध्ये शिकणाऱ्या मुलांना तज्ञ प्रशिक्षकांकडून सुंदर हस्ताक्षर, योग, चित्रकला, हस्तकला, गायन, नृत्य आणि खेळ वगैरे कलांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहितीसाठी खालील ८५५२००४३८७ व ९७६४३६६६२७ संपर्क साधावा, असे आवाहन स्वरगंधा विद्यालयाने केले आहे.

# उघड्या कालव्यात पडून मृत्यू

## स्थानिकांचा संताप | सुरक्षा उपाययोजनांच्या अभावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर

■ टीम दैनिक हेराल्ड



**सांगे, दि. ३१ :** कोठार्ली, सांगे येथे घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण केला आहे. ५७ वर्षीय प्रकाश गावकर यांचा उघड्या कालव्यात पडून मृत्यू झाल्याने, परिसरातील सुरक्षा उपाययोजनांच्या अभावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या दुर्घटनेनंतर रहिवाशांनी प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, त्वरित कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

स्थानिक पंचसदस्य विठ्ठल गावकर यांनी याप्रकरणी प्रशासनाच्या निष्क्रीय भूमिकेवर टीका केली. त्यांनी सांगितले की, गेल्या दशकभरात या कालव्यात पडून किमान १० ते १५ लोकांनी प्राण गमावले आहेत. अनेक वेळा प्रशासनास लेखी आणि तोंडी मागणी करूनही संरक्षक कठडे किंवा रेलिंग बसविण्यात आलेले नाहीत. या कालव्याच्या अवघ्या ५० मीटर अंतरावर शाळा असून, लहान मुलांच्या सुरक्षेला गंभीर धोका आहे, असे एका रहिवाशाने सांगितले.

रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, तीन वर्षांपूर्वी जलसंपदा मंत्री सुभाष शिरोडकर यांनी कालव्याच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही हालचाल न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर, प्रशासनाचे डोळे उघडण्यासाठी स्थानिक रहिवाशांनी सोमवारी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

कालव्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असून, नागरिकांना ये-जा करण्यासाठी केवळ कच्चा रस्ता आहे. परिणामी, अनेक लहान मुले आणि रहिवासी दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करत आहेत. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे स्थानिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, तातडीने सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना न केल्यास अधिक मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, अशी स्थानिक रहिवाशांची मागणी आहे.

# ७ एप्रिलला होणार शाळांबाहेर निदर्शने

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३१ :** राज्य सरकारने ७ एप्रिलपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचा निर्णय घेतल्यास, पालक आणि नागरी समाजाच्या सदस्यांनी शाळांसमोर निदर्शने करण्याचा इशारा दिला आहे. रविवारी मडगावच्या ऐतिहासिक लोहिया मैदानावर झालेल्या जाहीर सभेत हा निर्णय घेण्यात आला.

पालकांनी सरकारच्या या निर्णयाविरोधात कायदेशीर पर्यायांचा विचार करण्याचा निर्धार व्यक्त केला असून, ७ एप्रिल रोजी आपल्या मुलांना वर्गात पाठवून शाळांबाहेर निदर्शने करण्याचा संकल्प केला आहे. बैठकीत उपस्थित शाळकरी मुलांनीही कवितांच्या माध्यमातून आपल्या तक्रारी मांडत सरकारला निर्णयावर पुनर्विचार करण्याची विनंती केली.

यावेळी दक्षिण गोव्याचे खासदार विरियेतो फर्नांडिस, आमदार विजय सरदेसाई, क्रूझ सिल्वा आणि वेंझी व्हिएगस यांनी पालकांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. खासदार फर्नांडिस यांनी संसद अधिवेशनात केंद्रीय शिक्षणमंत्र्यांकडे हा मुद्दा मांडण्याचे आश्वासन दिले. मी शिक्षणमंत्र्यांना निवेदन सुपूर्द करीन आणि त्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी करीन, असे त्यांनी स्पष्ट केले.

गोवा फॉरवर्ड पक्षाचे नेते विजय सरदेसाई यांनी सरकारच्या हुकूमशाही निर्णयावर टीका केली. गोव्यात एप्रिलमध्ये प्रचंड उष्णता असते, तर दिल्लीत उन्हाळा उशिरा सुरू होतो. सरकारने दिल्लीच्या धर्तीवर येथे निर्णय घेऊ नये, असे त्यांनी सांगितले. तसेच, भाजप सरकारच्या धोरणांवरही त्यांनी टीका करत, हे सरकार समाजातील सर्व घटकांना लक्ष्य करत आहे. हा लढा अधिक तीव्र करावा लागेल, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार वेंझी व्हिएगस यांनी मुख्यमंत्र्यांकडे या तडकाफडकी घेतलेल्या निर्णयाचे कारण विचारले असता, त्यांच्याकडे समाधानकारक उत्तर नव्हते, असे त्यांनी सांगितले. पालकांनी एकजूट होऊन हा लढा लढला पाहिजे. शाळांबाहेर फलक आणि बॅनर लावून सरकारच्या निर्णयाला विरोध केला पाहिजे, असे त्यांनी सूचविले.

आमदार क्रूझ सिल्वा यांनीही गोव्यात एनईपी लागू करण्याच्या पद्धतीवर आक्षेप घेतला. गोवा सरकारने दिल्लीच्या पद्धतीचे अंधानुकरण करू नये. इतर दक्षिणेकडील राज्ये स्थानिक गरजा लक्षात घेऊन एनईपीमध्ये सुधारणा करत आहेत. गोव्यानेही तसेच करावे, असे त्यांनी सांगितले.

बैठकीच्या अखेरीस संवादात्मक सत्र आयोजित करण्यात आले, जिथे मुलांनी उत्साही गीतांवर नृत्य आणि गायन करून आपल्या भावना व्यक्त केल्या. हा क्षण त्यांच्या हक्कांसाठी लढण्याच्या दृढनिश्चयाचे प्रतीक ठरला. अखेरीस उपस्थितांनी राष्ट्रगीत गाऊन आंदोलनाला सामूहिक पाठिंबा दर्शविला.कार्यकर्ते अँथनी डिसिल्वा, सेसिल रॉड्रिग्ज, सॅव्हियो कुतिन्हो आणि दीपेश काशीनाथ नाईक यांनीही सभेला संबोधित केले आणि या आंदोलनाला समर्थन दिले.

# वार्का ग्रामसभेचा वेळसाव-केळशी रस्ता रुंदीकरणास तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३१ :** वेळसाव ते केळशी दरम्यानच्या रस्त्याच्या प्रस्तावित विस्ताराला आणि साळ नदीत तीन नवीन जेट्टी बांधण्याच्या प्रकल्पाला वार्का ग्रामसभेने तीव्र विरोध दर्शवला आहे. सरपंच फ्लेव्हिया बॅरेटो यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत हे दोन ठराव बहुमताने मंजूर करण्यात आले. या प्रस्तावांविरोधात अन्य अनेक किनारी पंचायतींनीही आक्षेप नोंदवले असल्याची माहिती मिळाली आहे.

ग्रामसभेत अनेक महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. यामध्ये गावाच्या आर्थिक अंदाजपत्रकालाही मंजुरी देण्यात आली. विशेषतः भटक्या प्राण्यांच्या वाढत्या संख्येचा विचार करून, निर्बीजीकरणासाठी गोवा ॲनिमल वेल्फेअर ट्रस्ट सोबत करार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवता येईल. बेकायदेशीर बांधकामांविषयी उच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील आदेशावरही ग्रामसभेत चर्चा झाली. या पार्श्वभूमीवर, ग्रामस्थांना कायदेशीर बाबींविषयी अधिक माहिती मिळावी म्हणून पंचायत विशेष सत्र आयोजित करण्याचा विचार करत आहे.

तसेच, गावात वाढत्या मोठ्या प्रकल्पांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. पंचायत प्रशासनाने गावाच्या पाण्याच्या उपलब्धतेचा सखोल अभ्यास करण्यासाठी एका सल्लागाराची नेमणूक करण्याचा निर्णय घेतला आहे.

अनेक वेळा विविध शासकीय विभाग पंचायत सदस्यांशी चर्चा न करता मोठ्या प्रकल्पांना मंजुरी देतात. त्यामुळे, भविष्यात अशा प्रकल्पांना परवानगी द्यावी की नाही, याचा निर्णय घेण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरेल, असे पंचायत सदस्यांचे मत आहे. याशिवाय, वार्का खाडीच्या पर्यावरणीय स्थितीचा आढावा घेण्यासाठी गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला चाचण्या करण्याची विनंती करण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतला आहे.

ग्रामस्थांचा वाढता विरोध आणि स्थानिक पर्यावरणीय चिंता लक्षात घेता, हे प्रकल्प पुढे सरकवण्यासाठी प्रशासनाला स्थानिक जनतेच्या भावना विचारात घ्याव्या लागणार आहेत.

# ...अखेर कातकरी समाजाच्या झोपड्यात प्रकाश

## वीज आल्याने कातकरी समाजाच्या आनंदाला उधाण

■ टीम दैनिक हेराल्ड



**केरी, दि. ३१ :** अजूनपर्यंत रात्रीच्यावेळी अंधारात राहिलेल्या फोंडातील निरंकाल गवळीवाडा येथील कातकरी समाजाच्या झोपड्यांमध्ये अखेर वीज आली आहे. त्यामुळे त्यांची गेल्या अनेक वर्षांपासून असलेली मागणी पूर्ण झाली आहे. ही वीज जेव्हा त्यांच्या झोपड्यात आली तेव्हा विजेअभावी होत असलेल्या अनेक गैरसोयी आता दूर होणार आहे.

दरम्यान कातकरी वस्तीवर नुकतीच वीज खात्याने इथल्या २० झोपड्यांना भूमिगत वीज जोडणी देऊम त्यांना वीज पुरवठा केला आहे. यावेळी झालेल्या उद्घाटन सोहळ्यास वीज खात्याचे कार्यकारी अभियंता सुदन कुकळकर, सहाय्यक अभियंता निळकंठ सावंत, कर्मचारी वर्ग तसेच संवेदन केंद्र या स्वयंसेवी संस्थेचे बाबनी मापारी आदी मान्यवर उपस्थित होते.

सहा महिन्यांपासून सुरू होती वीज जोडणी प्रक्रिया

वीज खात्याने या कुटुंबांना वीज जोडणी देण्यासाठी सहा महिन्यांपूर्वी प्रक्रिया सुरू केली होती. दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांच्या प्रयत्नांमुळे हे काम गतीमान झाले. भूमिगत वीज जोडणीसाठी तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्येक झोपडीत सुमारे दोन मीटर उंचीची भिंत उभारण्यात आली. यावर वीज मीटर, स्विच बोर्ड आणि बल्ब लावण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. कातकरी समाजाचा आनंद गगनात मावेना झोपड्यांमध्ये वीज आल्यानंतर कातकरी समाजाच्या नागरिकांचा आनंद गगनात मावेना झाला आहे. वीज सेवा ही आजची प्राथमिक गरज मानली जाते. त्यामुळे वीज आल्याने त्यांच्या अनेक समस्या दूर होणार आहेत.

दरम्यान या संबंधी स्थानिक रहिवासी गोपाळ पवार यांनी सांगितले की, आमच्या झोपड्यांमध्ये वीज यावी हे आमचे स्वप्न होते ते आज पूर्ण झाले. आधी वस्तीबाहेर विजेचे खांब होते, पण झोपड्यांमध्ये उजेड नव्हता. आता आम्हाला रात्री उजेड मिळेल, आमची मुले अभ्यास करू शकतील, फोन चार्ज करता येईल आणि स्वयंपाकासाठी मिक्सरही वापरता येईल. ही सुविधा मिळाल्याने आम्ही अत्यंत आनंदित आहोत. कातकरी समाजाने गोवा सरकार, वीज खाते, दक्षिण गोवा खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस आणि या कार्यासाठी मदत करणाऱ्या सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते यांचे आभार मानले आहेत.






# सीआरझेड मध्ये कुंपण प्रस्तावाला कार्मोना ग्रामसभेचा तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३१ :** कार्मोना ग्रामसभेने एका राजकीय कुटुंबाच्या खाजगी जमिनीवर कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) अंतर्गत कुंपण घालण्याच्या प्रस्तावाला एकमताने विरोध दर्शवला आहे. रविवारी झालेल्या विशेष ग्रामसभेत पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन होण्याच्या शक्यतेमुळे ग्रामस्थांनी तीव्र आक्षेप नोंदवला.

वादग्रस्त प्रस्तावानुसार, कोस्टल रेग्युलेशन झोन नियमांतर्गत येणाऱ्या भागात तात्पुरते मासेमारी शेड बांधण्याची तसेच कुंपण उभारण्याची परवानगी मागण्यात आली होती. या क्षेत्रांमध्ये दोन वेगवेगळ्या सर्वेक्षण क्रमांकांचा समावेश असून, त्यापैकी एक भूभाग भातशेतीसाठी तर दुसरा खारफुटीच्या जंगलासाठी आरक्षित आहे. ग्रामसभेपूर्वी पंचायतीने प्रकाशित केलेल्या सूचनेनुसार, या भूभागांचा काही भाग नदी, नाला व तलावासाठी राखीव असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्रामसभेदरम्यान जोरदार चर्चा झाली असून ग्रामस्थांनी १३ ठोस आक्षेप नोंदवत, कोणतीही परवानगी देण्यापूर्वी गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीकडून संपूर्ण स्पष्टीकरण मिळविण्याची मागणी केली. सीआरझेड – २०११ ची अधिसूचना आणि प्रादेशिक योजना २०२१ यांचा समन्वय साधून निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

स्थानिकांनी गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीकडून अद्याप स्थळ पाहणी का करण्यात आली नाही, याबाबत प्रश्न उपस्थित केला. गावातील पारंपारिक मासेमारी कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू असताना कुंपण उभारण्याची गरज काय, असा मुद्दाही ग्रामस्थांनी मांडला. विद्यमान नियमानुसार खझान जमिनींवर कोणत्याही प्रकारचा विकास होऊ नये, तसेच हा भूभाग नो डेव्हलपमेंट झोनअंतर्गत येत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

बैठकीनंतर सरपंच सँड्रा फर्नांडिस यांनी माध्यमांशी संवाद साधताना स्पष्ट केले की, प्रस्तावित कामे अधिसूचित बंधाऱ्यावर होत असल्याने हा विषय सार्वजनिक हिताचा आहे आणि त्यामुळेच ग्रामसभा बोलावण्यात आली. पंचायतीने संबंधित मालकाला पत्राद्वारे काही विसंगतींबाबत स्पष्टीकरण मागितले आहे, असे फर्नांडिस यांनी सांगितले.

ग्रामसभेच्या मागण्यांच्या अनुषंगाने पंचायत मंडळाच्या बैठकीत या विषयावर सखोल चर्चा केली जाईल आणि त्यानंतर सीआरझेड संबंधित आवश्यक स्पष्टीकरणांसाठी गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी ला पत्र पाठवण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या साप्ताहिक सार्वजनिक तक्रार बैठकीत माध्यमांनी संबंधित मंत्र्यांना या वादग्रस्त प्रकरणाबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांच्या मालमत्तेच्या बाबतीत कोणतेही गैरप्रकार झाल्याच्या सर्व आरोपांचे खंडन केले आहे.


